# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा. क्र. तंशिविकापु/विवि/ईबीसी २०१७-१८/२०१८/757 दिनांक 17 FEB

प्रति,
संचालक /प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना या योजनांचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीताचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे बाबत...

संदर्भ :-१) संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक १८/तंशिस/जाहीरात/२०१८/६० दिनांक १६/०२/२०१८

२) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र४६५/तांशि-४ दिनांक १४/०२/२०१८

३) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६प्र.क्र ५५९/ ताशि-४ दिनांक २१/०६/२०१७.

४) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र.३३२/तांशि-४ दिनांक ७/१०/२०१७

५) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन शुद्विपत्र क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र.३३२/तांशि-४ दिनांक १३/११/२०१७.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र १ नुसार मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमात केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेतलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्वतीने खालील योजनांचे मागविण्यात आले आहेत.

अ) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

ब) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.

सोबत तंत्रशिक्षण संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहिरात जोडली असून त्यात नमूद केलेल्या वेळापत्रका राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना या योज शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीताचे पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दती भरण्याबाबत व त्यांची छाननी करणे बाबतची कार्यवाही विहित मुदतीमध्ये करण्यात यावी.

उपरोक्त दोन्ही योजनासाठीचे पात्रतेचे निकष तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. योजनांची माहिती आपल्या संस्थेच्या दर्शनी भागातील सुचना फलकावर कायमस्वरुपी लावावी. तसेच, उपरोक्त संदर्भिय निर्णय क्रमांक ३ ते ५ मध्ये नमुद केलेल्या पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार पात्र विद्यार्थ्यांपैकी एकही पात्र लाभार्थी विद्यार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संस्था प्रमुखांनी घ्यावी. यासाठी संचालनालयाने जाहीर केलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

Rayat Shikshan Sanstha's
Karmaveer Bhaurao Patil Institute Of
Management Studies & Research Satara
Inward No 1102/18
Date - 20 FEB 2018

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६१७९६९, फॅक्स : ०२२-२२६९०००

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in website: www.dtemaharashtra.g...


का.क्र १८ /तंशिसं/जाहीरात/२०१८/६० दिनांक: १६.०२.२०१८

**तंत्रशिक्षणातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ. पंजाबराव देशमुख वस... निर्वाह भत्ता योजनाकरिता अर्ज : २०१७-१८**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण- २०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४, दिनांक १४ ... २०१८ नुसार मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणा-या आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रि... (CAP) प्रवेश घेतलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने खालील योजनांसाठी अर्ज माग... येत आहेत.

अ. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-
ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखापर्यंत आहे अशा वि... शैक्षणिक व परीक्षा शुल्कांच्या ५० टक्के शिष्यवृत्ती देण्यात येईल.

ब. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

- अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरांतील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक... प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद व नागपूर) संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रति... ३,०००/- व राज्यातील इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिमहा रु. २,०००/- इतका व... निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महिन्यासाठी अनुज्ञेय राहील.
- इतर विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. १.०० लाखापर्यंत असल... विद्यार्थ्यांना प्रतिमहा रु. ३००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महिन्यासाठी... राहील.

टिप :- १) पात्रतेचे निकष तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ - www.dtemaharashtra.gov.in वर ... आहेत.

२) वरील योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा ... येईल. त्या करिता विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड नंबर बँक खात्याशी संलग्नित करुन घ्यावे.

वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-
सन २०१७-१८ साठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी [ज्यांनी www.mahadbt.gov.in या महाडीबीटी पोर्टल... केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी सुध्दा] वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज www.dtemaharshtra.go... संकेतस्थळावर सुचनांचे पालन करुन संपुर्ण अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन पध्दतीने भ...

| अ.क्र. | कार्यपध्द्ती | पासुन | पर्यंत |
| --- | --- | --- | --- |
| १ | सर्व पात्र विद्यार्थ्यांनी www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे. | १७-०२-२०१८ | ०३-०३-२० |
| २ | संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्ड चा वापर करुन सर्व अर्जांची छाननी करणे. | २०-०२-२०१८ | १२-०३-२० |
| वेळापत्रकात काही बदल झाल्यास संकेतस्थळावर देण्यात येईल. | | | |

सर्व संस्थाच्या प्राचार्यांना / संचालकांना सुचना देण्यात येते की, उपरोक्त योजनांची माहिती संस्थांच्या भागातील सुचना फलकावर कायमस्वरुपी लावावी, सर्व विद्यार्थ्यांना वरील योजनांची माहिती द्याव विद्यार्थांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून घेण्यात यावे व भरलेल्या अर्जांची पुढील कार्यवा ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीत छाननी करावी.

सही /-
(डॉ. अभय वाघ)
नोडल ऑफिसर तथा संचा
तंत्रशिक्षण, म.रा. मुंब

सांकुके ए. डी.

20/2/2018

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क
शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल
घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची
व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा
समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
**शासन शुद्धिपत्र क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: १३ नोव्हेंबर, २०१७

**<u>संदर्भ</u> :-** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण -२०१७/ प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७ /१०/२०१७

**<u>शुद्धिपत्र</u> :** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण -२०१७/प्र.क्र.३३२/ तांशि-४, दिनांक ७/१०/२०१७ मध्ये पृष्ठ क्र. १० वरील मुद्दा क्र. १० मधील शेवटून दुसऱ्या ओळीमधील "<u>प्रतिमाह</u>" हा शब्द वगळण्यात येत आहे.

२. सदर शासन शुध्दिपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७१११३१३१८५२७७०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c0bf911362ce57b361b7f36471cb98cb9... 211b987e6e0fc2e3, cn=Madan Maruti Morve
Date: 2017.11.13 15:52:05 +05'30'

(म. मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
५. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव (पशु संवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय) विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

व रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सक्षम शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे निश्चित केल्याप्रमाणे शिक्षण शुल्क महाविद्यालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यंतची रक्कम ही अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधित बँकेस वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयानुसार अदा करण्यात येईल.

७) वरीलप्रमाणे शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा देण्यात येणारा लाभ हा शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या निवडक अभ्यासक्रमांसाठीच मर्यादित असेल.

८) तसेच सदरच्या सुधारीत राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विविध प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील शासन मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संबंधित विद्यापीठ, तंत्र शिक्षण मंडळ, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, इत्यादींकडून आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यन्तचे व शासन मान्यताप्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेकरीता १०० टक्के परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही शिष्यवृत्ती स्वरुपात पात्र विद्यार्थ्यांना करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) तसेच शासनाने वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांशिवाय सदरच्या सुधारीत योजनेनुसार वरीलप्रमाणे नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना देखील प्रवेश घेणाऱ्या अल्प भूधारक शेतकरी आणि नोंदणीकृत मजूरांच्या पाल्यांना डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून लागू करण्यात येत आहे.

१०) याशिवाय ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्प भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु.१.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रचलित व नव्याने समाविष्ट करण्यात येणाऱ्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसह बिगर व्यावसायिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी/ १२ वी) अभ्यासक्रमांसाठी, शैक्षणिक वर्षातील दहा महिन्याकरीता प्रतिमाह खालील नमूद दराप्रमाणे निर्वाह भत्ता अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ.पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना व इतर शिक्षण शिष्यवृत्ती योजना महाडीबीटी पोर्टलमधून काढण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: १४ फेब्रुवारी, २०१८

**<u>संदर्भ</u>**: १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१६/ प्र.क्र.५५९/ तांशि-४, दिनांक १५.४.२०१७.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.३३२/ तांशि-४, दिनांक ७.१०.२०१७.
३) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक इबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/शिक्षण-१, दिनांक ८.१२.२०१७.

**<u>प्रस्तावना</u>:-**

विविध विभागांच्या केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क / परीक्षा शुल्क योजनांतर्गत लाभाची रक्कम पात्र विदयार्थ्यांना देण्यासाठी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केले आहे. सदर महाडीबीटी पोर्टलवर काही विदयार्थ्यांना अर्जाची नोंद करण्यास अडचणी येत आहेत. त्याचबरोबर महाविदयालयांकडून विदयार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज शासकीय कार्यालयांकडे पाठविण्यास अडचणी येत असल्याने आणि सन २०१७-१८ च्या पहिल्या सत्रासाठी सदरहू पोटलचे पूर्णत: कार्यन्वयन होणे बाकी आहे त्यामुळे विविध विभागांनी संदर्भिय शासन निर्णयान्वये विहित केलेल्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इत्यादि योजनांच्या प्रदानांची रक्कम डिबीटी पोर्टलव्दारे विदयार्थ्यांना उपलब्ध करण्यास काही अवधी लागणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यानुसार विविध विभागांच्या केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती / फ्रीशिप योजना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता महाडीबीटी पोर्टल मधून वगळण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळाच्या दिनांक २१/११/२०१७ रोजी घेतलेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. सदर प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या कार्यवृत्तामध्ये नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शालेय शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग यांच्या योजना महाडीबीटी प्रणालीतून वगळण्यात व त्यांची

अंमलबजावणी ऑफ-लाईन पध्दतीने करुन आधार संलग्नीत बँक खात्यात लाभ अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याच धर्तीवर उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील विविध शिष्यवृत्ती योजना देखील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे परंतु संबंधीत योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:-

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विदयार्थ्यांकरीता असलेल्या तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना आणि उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व विविध शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे परंतु संबंधीत योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. हया शिक्षण शिष्यवृत्ती / निर्वाह भत्ता योजना पूर्वीप्रमाणेच तंत्र शिक्षण संचालनालयाने व उच्च शिक्षण संचालनालयाने विहित केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे राबविण्यात येतील. तथापि लाभाची रक्कम विदयार्थ्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल. त्याकरिता महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम,२०१६ च्या कलम ३ मधील तरतूद याकरीता विचारात घेण्यात येईल.

३. विशेष चौकशी पथकाने कारवाईसाठी शिफारस केलेल्या दोषी संस्था व अनुज्ञेय नसलेले अभ्यासक्रम वगळण्यात येतील.

४. सदर प्रयोजनासाठी महाडीबीटी पोर्टलवर विदयार्थ्यांनी भरलेला डेटा (अपलोडेड फाईल्स वगळून) माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून उपलब्ध करुन घेण्यात येईल.

५. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता आधार संलग्नित बायोमेट्रीकक उपस्थितीच्या अहवालाऐवजी संस्थांकडे असलेली उपस्थितीची माहिती / पुरावा ग्राहय धरण्यात येईल.

६. तंत्र शिक्षा संचालनालयाकडून या प्रयोजनासाठी पूर्वीची यंत्रणा /एजन्सी यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात येतील.

७. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाकडून विदयार्थ्यांच्या आधार क्रमांकाची सत्यता (ऑथेंटिकेशन) पडताळण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे आवश्यक ते सहकार्य घेण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०२१४१३१८१६३५०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, o...
Technical Education Department, postalCode...
st=Maharashtra,
2.5.4.20=2efbf911362ce57b361b7f36471c...
e8b061211b9d7e6e0fc2e3, cn=Madan Maruti M...
Date: 2018.02.14 13:24:13 +05'30'

( म.मा.मोरवे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, (माहिती तंत्रज्ञान),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव (प.दु.म), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
१५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
१६. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१७. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१८. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

२०. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२१. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२२. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२४. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२६. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२७. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२९. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
३०. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
३१. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.मागणगांव, जि.रायगड
३२. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३४. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३५. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३६. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
३७. सर्व जिल्हाधिकारी
३८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
४०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४३. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४४. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४५. अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४६. कक्ष अधिकारी(मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
४७. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
४८. निवडनस्ती/तांशि-४

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/ईबीसी २०१७-१८/२०१८/720 दिनांक :- 15/

प्रति,

प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था

विषय :- उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना महाडीबीटी पोर्टलमधून काढण्याबाबत....

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६प्र.क्र ५५९/ताशि-४ दिनांक २१/०६/२०१७.
२) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र.३३२/तांशि- दिनांक ७/१०/२०१७
३) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र४६५/तांशि- दिनांक १४/०२/२०१८

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०१७/प्र.क्र ४६५/ताशि- १४/०२/२०१८ नुसार शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील विविध मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांमध्ये शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकरीता असलेल्या तंत्र शिक्षण संचाल राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजन वर्ष २०१७-१८ करीता महाडीबीटी प्रणालीतून वगळून त्याची अंमलबजावणी पूर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे प योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करण्यास शासनाची मा आहे.

या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की संदर्भिय शासन निर्णय या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आला असून, त्याचे अवलोकन करावे. या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाकडून प्राप्त होणा-या सुचना आपणास कळविण्यात येतील त्याप्रमाणे कार्यवाही यावी.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्रमाक १ व २ मध्ये नमुद केलेल्या पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार पात्र वि एकही पात्र लाभार्थी विद्यार्थी योजनाच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संस्था प्रमुखांनी घ्यावी.

Gaikwad 15.2.18

f प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पु